संं.फौ.ख.क्र. ६३७/२०१९
सरकार-वि- हरीदास
निशाणी क्र. १० लगत

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची साक्ष.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव** - वसंत चंद्रभान शेंडे
**वय** - ५५ वर्ष, **व्यवसाय** - शेती
**पत्ता** - बडेगाव, तह. सावनेर, जि. नागपूर.

**सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. टी. एस. आरगे यांच्यामार्फत.**

दि. २६.०१.२०१९ रोजी बडेगाव येथील ग्रामपंचायतमध्ये सकाळी १०.०० वाजताच्या दरम्यान ग्रामसभा होती. चिंतामन बट्ठे त्यावेळी सरपंच होते. हरीदास बागडे व बट्ठे यांच्यामध्ये वाद झाला. बागडे यांनी बट्ठे यांना रोजगार सेवक म्हणून वेगळया व्यक्तीला का घेतले याच्यावरून वाद घातला. मी त्यावेळी हजर होतो. त्यांनी शिवीगाळ केली नाही. छत्रपाल तिथे हजर होता. मी ओरोपींना ओळखतो, ते आज न्यायालयात हजर आहेत.

**(साक्षीदार हा अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.)**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि. २६.०१.२०१९ रोजी आरोपींनी सरपंचांना साल्या, लवडयाचा बाल या भाषेत शिवीगाळ केली व बघून घेईल अशी धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पि. एन. काळे यांचेमार्फत**

**आरोपी हजर. आरोपींतर्फे वकील गैरहजर. आरोपींनी अर्ज दिला त्यावरील आदेशान्वये उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2025.05.21 12:45:45 +0530

सावनेर,
दिनांक २१.०५.२०२५

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe